भंडारा जिल्हा पोलीस वार्तापत्र

जा.क्र. ८३०/माहिती कक्ष/वार्तापत्र
पोलीस अधीक्षक कार्यालय, भंडारा
दिनांक २८/१२/२०१७

१) लोखंडी कोयत्याने मानेवर वार करून गंभिर दुखापत करून जिवानिशी ठार मारण्याचा प्रयत्न केल्याने गुन्हा नोंद. :–

दिनांक २६/१२/२०१७ चे २०.०० वाजता दरम्यान यातील जखमी फिर्यादी सुधाकर दिवाकर राव वय ४२ वर्ष रा. गिरोला हा त्याचे मित्रा सोबत अंबीका बार मध्ये दारू पित असतांनी यातील आरोपी हा दुसऱ्या व्यक्ती सोबत वाद घालत असतांनी वाद का करतो असे म्हणुन, फिर्यादी हा बार मधुन निघुन जावुन काही वेळाने पुन्हा बार मध्ये परत येवुन जखमी सुधाकर याचे पाठीमागुन लोखंडी कोयत्याने मानेवर वार करून गंभिर दुखापत करून जिवानिशी ठार मारण्याचा प्रयत्न केल्याने ,जखमीचे चे बयान व डॉ. रिपोर्ट पोलीस स्टेशन भंडारा येथे कलम ३०७ भादवी. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील सपोनी. उईके पोलीस स्टेशन भंडारा हे करीत आहेत.

२) अल्पवयीन मुलीचा विनयभंग केल्याने गुन्हा नोंद. . :–

दिनांक २६/१२/२०१७ चे ०६.०० वाजता दरम्यान यातील फिर्यादी ही अल्पवयीन असुन आपले घरून शाळेत जात असतांना तिचा पाठलाग करून तिला चॉकलेट देण्याच प्रयत्न केला व घरा समोरून जात असतांना तिला थांबवुन तिचा विनयभंग केल्याने फिर्यादीचे तोंडी रिपोर्ट वरून पोलीस स्टेशन भंडारा येथे कलम ३५४(अ)(ड)(१) भादवी. सहकलम १२ पोक्सो ॲक्ट अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास सपोनी. उईके पोलीस स्टेशन भंडारा हे करीत आहेत.

३) महिलेचा विनयभंग केल्याने गुन्हा नोंद. . :–

दिनांक २७/१२/२०१७ चे २३.११ वाजता दरम्यान यातील फिर्यादी ही आपले गावावरून एकटी डांबरी रोडने जात असता, यातील आरोपीने मोटार सायकल ने तिचे जवळ येवुन तिला सोडुन देतो असे म्हणुन तिला मोटार सायकलवर बसवुन तिचा विनयभंग केल्याने व ती मोटार सायकलवरून खाली पडुन मार लागल्याने, फिर्यादीचे तोंडी व डॉ. रिपोर्ट वरून पोलीस स्टेशन अडयाळ येथे कलम ३५४(अ)(१) ३३७, भादवी. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोहवा. सतदेवे पोलीस स्टेशन अडयाळ हे करीत आहेत.

४) संगनमत करून महिलेचा शारीरक व मानसिक छळ केल्याने गुन्हा नोंद. . :–

दिनांक १२/०७/२०१७ चे आज पावेतो यातील आरोपी क्र. १ ते ३ यांनी संगनमत करून पैसे आण असे म्हणुन फिर्यादी सोबत भांडण करून तिचा शारीरीक व मानसिक छळ करून आशा प्रगती कौटुंबीक सल्ला व मार्गदर्शन केन्द्र पो.स्टे. लाखनी यांचे अहवाल व फिर्यादीचे लेखी रिपोर्ट वरून पोलीस स्टेशन लाखनी येथे कलम ४९८(अ),(१),३४ भादवी. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास सफौ. उईके पोलीस स्टेशन लाखनी हे करीत आहेत. आरोपी अटक आहे.

५) बार मध्ये प्रवेश करून चोरी करण्याचा प्रयत्न केल्याने गुन्हा नोंद. . :–

दिनांक २७/१२/२०१७ चे ०२.१३ ते १४.३० वाजता दरम्यान यातील फिर्यादी हेमंत बाबुराव धुमनखेडे वय ४६ वर्ष रा. विद्यानगर भंडारा याचे मधुबन बारच्या छतावरून चढुन खिडकीतुन बार मध्ये प्रवेश करून चोरी करण्याचा प्रयत्न केल्याने फिर्यादीचे तोंडी रिपोर्ट वरून पोलीस स्टेशन भंडारा येथे कलम ३८०,५११ भादवी. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोहवा. शेंडे पोलीस स्टेशन भंडारा हे करीत आहेत.

६) एटीएम कार्ड मधील पिनकोड क्रमांक चोरून वापर करून खात्यातील पैसे काढुन घेतल्याने गुन्हा नोंद . :–

दिनांक १९/१२/२०१७ चे १५.०० ते १५.३५ वाजता दरम्यान यातील फिर्यादी अविनाश सदाशिव ऊके वय २४ वर्ष रा. सुरेवाडा हा एसबीआय एटीएम मध्ये पैसे काढण्यास गेला असता त्याचे पाठी मागील अज्ञात आरोपीने पैसे काढुन देतो असे म्हणुन विश्वासाने एटीएम कार्ड घेवुन त्याचा पिन कोड क्रमांक चोरून वापर करून फिर्यादीचे खात्यातील २६,५००/रु. अप्रमाणीकपणे काढुन घेतल्याने फिर्यादीचे तोंडी रिपोर्ट वरून पोलीस स्टेशन भंडारा येथे कलम ४०६ भादवी. सहकलम ६६(क) माहीती तंत्रज्ञान कायदा २००० अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोउपनी. बोरकर पोलीस स्टेशन भंडारा हे करीत आहेत.

७) अज्ञात पांढ–या रंगाच्या व्हॅनच्या धडकेत एक फॅक्चर. . :–

दिनांक २५/१२/२०१७ चे २०.०० वाजता दरम्यान यातील जखमी फिर्यादी राजकुमार महादेव गजभिये वय ६५ वर्ष रा. शहापुर हा एनएच ०६ रोड क्रॉस करीत असतांना नागपुर कडुन येणाऱ्या यातील आरोपी अज्ञात पांढ–या रंगाच्या व्हॅनचा चालकाने आपल्या ताब्यातील वाहन भरधाव वेगाने व निष्काळजीपणे चालवुन फिर्यादीला कट मारल्याने त्याचा डाव्या हाताचा मोंडा फॅक्चर करण्यास कारणीभुत झाल्याने व अपघाताची सुचना न देता पळुन गेल्याने फिर्यादी जखमीचे बयान व डॉ. रिपोर्ट वरून स्टेशन जवाहरनगर येथे कलम २७९,३३८ भादवी. सहकलम १८४,१३४/१७७ मोवाका. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोना. कडव पोलीस स्टेशन जवाहरनगर हे करीत आहेत.

८) आमरोड वर येणा–या जाणा–या वाहतुकीस व लोकांच्या जिवितास धोका निर्माण होईल अशा स्थितीत वाहन उभी करून मिळून आल्याने गुन्हा नोंद :–

दिनांक २७/१२/२०१७ चे १९.४५ वाजता दरम्यान यातील आरोपी चालकाने त्याचे ताब्यातील ट्रक जगनाडे चौक ते वरठी कडे जाणारा मुख्य डांबरी रोडवर महावीर टेडर्स समोर वरठी येथे आमरोडवर येणाऱ्या जाणाऱ्या वाहतुकीस व लोंकाचे जिवीतास धोका निर्माण होईल अशा स्थितीत ऊभे करुन मिळुन आल्याने सर तर्फे फिर्यादी पोना. शेंडे यांचे रिपोर्ट वरून पोलीस स्टेशन वरठी येथे कलम २८३ भादंवि. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोना. शेंडे पो.स्टे. वरठी हे करीत आहेत

९) विषारी औषध प्राशन करून इसमाने आत्महत्या केल्याने मर्ग नोंद. :–

दिनांक २५/१२/२०१७ ते २६/१२/२०१७ चे २४.०० वाजता दरम्यान यातील मृतक सिध्दार्थ भगवान बहादुरे वय २८ वर्ष रा. ठाणेगाव हा दारू पिण्याचे सवयीचा असुन दारूच्या नशेत विषारी औषध (थिमेट) प्राशन करून आत्महत्या केल्याने फिर्यादी सौ. मिना प्रितम मेंढे वय २५ वर्ष रा. भेंडाळा तोंडी रिपोर्ट वरून पो.स्टे. पवनी येथे कलम १७४ जाफौ. अन्वये मर्ग नोंद करण्यात आला. पुढील तपास पोहवा. कटारे पो.स्टे. पवनी हे करीत आहेत.

१०) <u>अवैध दारु /जुगार अड्डयांवर धाडी .</u> :–

दिनांक २७/१२/२०१७ रोजी भंडारा जिल्हा पोलीसांनी पोलीस स्टेशन भंडारा, कारधा, सिहोरा आंधगाव, साकोली व गोबरवाही येथे अवैध दारू/जुगार अड्डयांवर धाडी घालुन एकुण ०८ गुन्हे दाखल करून आरोपीतांच्या ताब्यातुन ६६ लटर हातभट्टी दारू किंमती ५,३२०/–रु. व जुगारातुन १६३०/रु. असा एकुन ६,९५०/रु. चा माल जप्त करण्यात आला.

११) <u>मोटार वाहन कायदयाखाली कारवाई.</u> :–

दिनांक २७/१२/२०१७ रोजी भंडारा जिल्हा पोलीसांनी मोटार वाहन कायदयाखाली एकुण ६६ प्रकरणांची नोंद करण्यात आलेली असून त्यापैकी अवैध प्रवाशी वाहतुक केसेस – ०१, तीन सिटर वाहनांवरती– ०८ केसेस व ईतर वाहनांवरती –५७ केसेस करण्यात आलेले आहे.

**(मपोउपनी. प्रणती लांजेवार)**
**माहिती कक्ष भंडारा**
**दुरध्वनी.क्र. ८८०५६५७६२**

प्रति,

**जिल्हा माहिती अधिकारी, भंडारा**

वर्तमान पत्राचे संपादक व जिल्हा प्रतिनिधी यांना उपरोक्त माहीती दैनिक वर्तमान पत्रात प्रसिध्द करण्याकरीता कळविण्यास विनंती आहे.

**प्रत, संगणक कक्ष,** भंडारा यांना भंडारा पोलीस संकेतस्थळावर ठेवण्याकरीता.